रेव्हन 124.22 (J)

**<u>मुंबई उच्च न्यायालय,</u>**

**<u>नागपूर खंडपीठ, नागपूर.</u>**

फौजदारी पुनरिक्षण अर्ज क्रमांक 124/22

**अर्जदार:** रत्नामाला पुष्पकर नाईक,

वय 59 वर्ष, व्यवसाय: घरकाम,

राहणार :मेजर स्टोर चे समोर,

ताडोबा रोड, चंद्रपूर,

जिल्हा.चंद्रपूर.

**विरुद्ध**

**गैर–अर्जदार**: महाराष्ट्र राज्य,

मार्फत

पोलीस स्टेशन अधिकारी,

पोलीस स्टेशन, रामनगर,

चंद्रपूर, ता. आणि जिल्हा.चंद्रपूर

-------------------------------------------

याचिकाकर्त्या तर्फे अधिवक्ता – श्री. अक्षय नाईक.

गैरअर्जदार/सरकार तर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता – श्री. एस. ए.आशिरगडे.

---

**न्यायमंच: माननीय न्यायमूर्ति जी.ए. सानप ,**

**तारीख: ०७, जानेवारी २०२३.**

**<u>मौखिक न्यायनिर्णय.</u>**

1. म्हणणे ऐकले.

2. **अर्ज स्वीकृत**. पक्षांच्या विद्वान अधिवक्ता ह्यांच्या संमतीने पुनरिक्षण अर्ज अंतिमतः निकाली काढण्या करिता, हाती घेतला.

3. या पुनरिक्षण अर्जाद्वारे, दिनांक 02.03.2022 रोजी विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधीश, चंद्रपूर, ह्यांनी सत्र प्रकरण क्र. ५१/२०१६ ह्या प्रकरणात, पारित केलेल्या आदेशाला आव्हान देण्यात आले आहे. ज्याद्वारे भा.दं.वि चे कलम 498–ए, 306, 304–बी, 34, आणि हुंडा बंदी कायदा, 1961, च्या कलम ४ अन्वये दंडनीय गुन्ह्यांसाठी अर्जदार/आरोपी क्र.2 ने आरोपमुक्ती साठी केलेला अर्ज (Exh. 29) फेटाळण्यात आला आहे.

4. पुनरिक्षण अर्जाच्या निर्णयासाठी संबंधित तथ्यांचा सारांश खालीलप्रमाणेः

मृतक प्रज्ञा हिचा विवाह अर्जदार/आरोपी क्र.२. ह्यांचा मुलगा–अमोल (आरोपी क्रमांक 1) ह्यांच्याशी झाला होता. त्यांचे लग्न 24 डिसेंबर 2015 रोजी झाले. मृतक प्रज्ञाने 26 जानेवारी 2016 रोजी आत्महत्या केली. लग्नापूर्वी या दोघांचे प्रेमसंबंध होते. अमोल आणि मृतक दोघांच्या कुटुंबियांच्या संमतीने प्रेमसंबंधांचे रुपांतर लग्नात झाले. सरकारी पक्षाचे म्हणणे आहे की मृतक हिच्या वडिलांनी लग्नात दीड लाख रुपये हुंडा दिला. लग्नानंतर नवरा/आरोपी क्र.1 आणि सासू(आरोपी क्र.२) ह्यांनी मृतक हिला घरगुती खर्चासाठी ४०,०००/– रुपये हुंड्याची मागणी केली. कथित मागणीची पूर्तता न केल्यामुळे मृतक हिच्यावर मानसिक व शारीरिक अत्याचार करण्यात आले. त्यामुळे तिने धावत्या रेल्वेगाडी समोरील रुळावर उडी मारून आत्महत्या केली. मृतक हिच्या वडिलांनी याबाबत पोलिसांना सूचित केले व पोलिसांकडे तक्रार नोंदविली. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान पोलिसांनी साक्षीदारांचे बयान तर नोंदवलेच पण त्याव्यतिरिक्त तपास करताना त्यांना एक लेखी चिठ्ठी देखील सापडली. ही लेखी चिठ्ठी 'सुसाईड नोट' म्हणून अभिलेखावर (on Record) आणली आहे. तपासाअंती आरोपी क्रमांक 1 आणि 2 ची गुन्ह्यात सहअपराधिता असल्याचे उघड झाले, ज्यामुळे आरोपी क्रमांक 1 आणि 2 विरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले.

5.	अर्जदार/आरोपी क्रमांक 2 ने आरोपमुक्ती साठी केलेला अर्ज, 06.11.2019 रोजी फेटाळण्यात आला. त्यानंतर अर्जदार/आरोपी क्रमांक 2 ने ह्या न्यायालयात पुनरिक्षण याचिका दाखल केली. ह्या न्यायालयात (न्यायमंच: माननीय न्यायमूर्ति अविनाश. जी. घरोटे) यांच्या दिनांक 14.02.2022 रोजी च्या आदेशाद्वारे वरील आदेश फेटाळला आणि पक्षकारांना सुनावणीची संधी देण्यासाठी आणि नीट विचारपूर्वक आदेश पारित करण्यासाठी प्रकरण पुन्हा न्याय चौकशी न्यायालयाकडे पाठविण्यात आले. आरोपमुक्ती साठी केलेल्या अर्जावर विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधीशांद्वारे सुनावणी झाली आणि या पुनरिक्षण याचिके मध्ये आक्षेपित केलेला आदेश पारित झाला.

6.	आरोपी क्रमांक 2 ने केलेल्या अर्जाचे सार असे आहे की गुन्ह्यात तिची सहअपराधिता प्रस्थापित करण्यासाठी आणि तिच्यावर आरोप निश्चित करण्यासाठी पुराव्याचा अंशही उपलब्ध नाही. अभियोग पक्ष ज्या मुद्द्यांचा आधार घेतला आहे, ते आरोपी क्रमांक २ वर आरोप निश्चित करण्यासाठीच्या कायद्याच्या मूलभूत आवश्यकता पूर्ण करीत नाही. मृतक हिच्या वडिलांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे आरोपी क्रमांक २ वर खोटे आरोप लावून त्याला गोवण्यात आले आहे .

7.	सरकारी पक्षाने या अर्जाला विरोध केला होता. सरकारी पक्षाच्या मते लेखी चिट्ठी, मृतक आणि साक्षदार ह्यांच्यातील व्हॉट्सॲप संदेश, साक्षदारांचे बयान ह्यांच्या स्वरूपात, आरोपी क्रमांक २ चा गुन्ह्यात थेट सहभाग प्रस्थापित करण्यासाठी भरपूर पुरावा आहे.

8.	मी, याचिकाकर्त्याचे विद्वान अधिवक्ता श्री. अक्षय ए. नाईक आणि विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए. आशिरगडे, ह्यांचे म्हणणे ऐकले आहे. अभिलेख व कार्यवाही (R and P) चे अवलोकन केले.

9.	याचिकाकर्त्याचे विद्वान अधिवक्त्याने सादर केले कि, गुन्ह्यात आरोपी क्रमांक २ ची सहअपराधिता सिद्ध करण्याकरिता अंशतः ही पुरावा उपलब्ध नाही. प्रथम खबरी

अहवालात तसेच साक्षीदारांच्या निवेदनात नमूद केलेली तथ्ये अस्पष्ट आहेत आणि आरोप सर्वसमावेशक आहेत. एकाही साक्षीदाराने आरोपी क्रमांक २ ने एखादी विशिष्ठ भूमिका बजावल्याचे सांगितले नाही. विद्वान अधिवक्त्याने पुढे असे सादर केले की लेखी चिठ्ठी तसेच व्हॉट्सॲप संदेशांमध्ये आणि साक्षीदारांच्या बयानांच्या आधारे आरोपी क्रमांक 2 द्वारे घडलेला कथित गुन्हा सिद्ध होत नाही. विद्वान अधिवक्त्याने पुढे असे सांगितले की, आरोपी क्रमांक २ ने एखादी विशिष्ठ भूमिका बजावल्याचे प्रथम खबरी अहवालात, मृतक हिच्या लेखी चिठ्ठीमध्ये, व्हॉट्सॲप संदेशांमध्ये आणि साक्षीदारांच्या बयानात आलेले नाही. त्यामुळे या प्रकरणात, सकृतदर्शनी, गुन्हेगारी उद्देश सिद्ध होत नाही असे विद्वान अधिवक्त्याने नमूद केले. या निवेदनांच्या समर्थनार्थ विद्वान अधिवक्त्याने **AIR 2022 SC** 820 मध्ये प्रसिद्ध झालेल्या **कहकशां कौसर उर्फ सोनम आणि इतर –विरुद्ध –स्टेट ऑफ बिहार आणि इतर;** All M.R.(Cri.) 3365 मध्ये प्रसिद्ध झालेल्या **एम. श्रीनिवास रेड्डी– विरुद्ध – स्टेट ऑफ महाराष्ट्र आणि इतर;** (2008) 10 SCC 394 मध्ये प्रसिद्ध झालेल्या **योगेश उर्फ सचिन जगदीश जोशी – विरुद्ध – स्टेट ऑफ महाराष्ट्र** आणि (2007) 9 SCC 721 मध्ये प्रसिद्ध झालेल्या **अप्पासाहेब आणि अन्य एक – विरुद्ध – स्टेट ऑफ महाराष्ट्र,** ह्या प्रकरणांतील निर्णयांचा आधार घेतला आहे.

10. कहकशां कौसर प्रकरण (वर उल्लेखित), ज्यामध्ये असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, सासरच्यांविरुद्ध केलेले आरोप स्पष्ट नसल्यामुळे त्यांच्यावर खटला चालविणे हा कायद्याचा दुरुपयोग ठरेल, हे प्रकरण फौजदारी प्रक्रियासंहितेच्या कलम ४८२ अंतर्गत प्रथम खबरी अहवाल रद्द करण्यासंबंधी आहे. त्यामध्ये असाही निष्कर्ष काढण्यात आला आहे की फौजदारी प्रक्रिया चालू ठेवण्यासाठी आरोपी व्यक्ती विरोधात स्पष्ट आरोप असले पाहिजेत. अस्पष्ट, सर्वसाधारण आणि सर्वसमावेशक आरोपांआधारे फौजदारी खटला चालवता येणार नाही.

11. (वर उल्लेखित ) एम. श्रीनिवास रेड्डी प्रकरणात ज्याचा मी एक पक्ष होतो, असा निर्णय देण्यात आला आहे की विशिष्ट आरोप आणि पुराव्या अभावी अभियोग पक्षाला

खटला चालवण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. या प्रकरणात पुरावा, मृतक हिने आत्महत्या पूर्वी लिहलेल्या चिट्ठीच्या स्वरूपात होता. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीचा विचार केला असता, त्यात अर्जदार श्रीनिवास रेड्डी यांची कोणतीही विशिष्ट भूमिका नसल्याचे आढळून आले. आत्महत्या पूर्वी लिहलेल्या चिट्ठीमध्ये आढळलेला एकमेव आरोप असा होता की, श्रीनिवास रेड्डी यांचा सह–आरोपी वरिष्ठ अधिकारी होता आणि जेव्हा मृतक हिने सह–आरोपीच्या हातून तिच्याशी गैरवर्तन आणि छळाची तक्रार केली तेव्हा रेड्डी यांनी त्याच्याविरोधात कोणतीही कारवाई केली नाही.विविध निर्णयांमध्ये नमूद केलेल्या कायद्याचा विचार करून, भा. द. वि. चे कलम 107 च्या मूलभूत आवश्यकता पूर्ण करण्यासाठी तर्कप्रबळ आणि प्रत्यक्ष पुरावाच्या अभावी फौजदारी प्रक्रिया चालवणे म्हणजे कायदाच्या प्रक्रियेचा दुरुपयोग होईल ,असे मत व्यक्त करण्यात आले.

12. योगेश उर्फ सचिन जगदीश जोशी प्रकरणात ( वर उल्लेखित ), फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 227 आणि 228 ची व्याप्ती विचारात घेण्यात आली आहे . असे ग्राहय धरण्यात आले आहे कि जर दोन मते समान असू शकतील आणि जर न्यायधीशांचे समाधान झाले आहे कि सादर केलेल्या पुराव्यांमुळे केवळ गंभीर संशयापेक्षा फक्त संशयच निर्माण होत असेल , तर आरोपीला दोषमुक्त करण्याचा पूर्ण अधिकार त्यांना असेल तर आरोप मुक्तीसाठी केलेल्या अर्जावरील निर्णयाच्या टप्प्यावर न्यायाधीशांनी पाहण्याची आवश्यकता नाही की खटला दोषसिद्धीच्या आधारावर संपणार आहे की उपलब्ध पुराव्याच्या आधारे

13. अप्पासाहेबांच्या खटल्यात (वर उल्लेखित), असे नमूद करण्यात आले कि विवाहा दरम्यान, दोन्ही पक्षांमध्ये मालमत्ता देणे व घेणे किंवा मौल्यवान सुरक्षा देणे व घेणे या दोन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत. काही आर्थिक अडचणींमुळे किंवा काही तातडीच्या घरगुती गरजांसाठी पैश्याची मागणी ही हुंड्याची मागणी म्हणता येणार नाही.

14. विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांनी सांगितले की, प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात कोणताही विलंब झाला नाही. त्यांनी पुढे निदर्शनास आणून दिले कि

प्रथम खबरी अहवाल तसेच साक्षीदारांच्या निवेदनात, व्हॉट्सअॅप संदेश आणि लेखी चिठ्ठीमध्ये आरोपी क्र.१ आणि २ यांची विशिष्ट भूमिका आहे .आरोपपत्रात संकलित केलेल्या पुराव्या आधारे विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांनी सांगितले कि आरोपी क्र १ आणि आरोपी क्र २ ची भूमिका सारखीच आहे त्यामुळे आरोपी क्र २ चा खटला आरोपी क्र १ च्या खटल्या पेक्षा चांगल्या आधारावर आहे असे म्हणता येणार नाही . विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांनी सादर केले की आरोपपत्रात संकलित केलेले पुरावे हे आरोप निश्चित करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 227 आणि 228 च्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी पुरेसे आहेत. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी येथे सादर केले कि जर अर्जदार /आरोपी क्र.२ यांच्या अधिवक्त्याने सादर केल्याप्रमाणे जर पुराव्याचे विवेचन करण्याची प्रकिया ह्या टप्प्यावर सुरु केली तर ती एक प्रकारची छोटी न्यायचौकशी करणेच होईल . अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांनी सादर केले की माननीय सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांमध्ये निकाली काढलेली कायदेशीर स्थिती अर्जदार/आरोपी क्रमांक 2 च्या खटल्याविरुद्ध आहे. या प्रकरणात त्यांनी ***तरुण जीत तेजपाल .वि. स्टेट ऑफ गोवा आणि इतर (2020) 17 SCC556*** या निर्णयावर भर दिला . या प्रकरणात हे निदर्शनास आणून दिले आहे की, ***निरंजन सिंग करम सिंग पंजाबी, वकील वि. जितेंद्र भीमराज बिजया आणि इतर*** [(1990) 4 SCC 76]आणि ***सज्जन कुमार. वि. सेंट्रल ब्युरो ऑफ इन्वेस्टीगेशन*** [(2010) 9 SCC 368]या प्रकरणातील निर्णयांचा विचार करण्यात आला आहे. या निर्णयांमध्ये असे नमूद केले आहे की फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 228 अंतर्गत आरोप निश्चित करतांना किंवा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 227 अंतर्गत दाखल केलेल्या आरोप मुक्तीचा अर्ज विचारात घेतांना पुराव्याचे विवेचन करणे अनुज्ञेय नाही. साधक–बाधक विश्वासार्हता किंवा पुराव्याची स्वीकार्यता यांना स्पर्श करणाऱ्या सर्व बाबींचे विश्लेषण करण्याची न्यायालयाला परवानगी नाही.

15. तरुण जीत तेजपाल यांच्या प्रकरणात (वर उल्लेखित) असे म्हटले आहे की,दोषमुक्तीसाठीच्या अर्जावर विचार करतांना न्यायालय अभियोग पक्षाच्या म्हण्याप्रमाणे काम करू शकत नाही किंवा टपाल कार्यालय म्हणून काम करू शकत नाही आणि आरोप

निराधार आहेत किंवा नाही हे शोधण्यासाठी पुरावा खोलात जावून तपासू शकते, जेणेकरून दोषमुक्तीचा आदेश देता येईल. आरोपमुक्त करण्यासाठीच्या अर्जाच्या विचारणाच्या टप्प्यावर, न्यायालयाने असे गृहीत धरून पुढे जावे की अभियोग पक्षाने अभिलेखावर (on record) आणलेला पुरावा खरा आहे आणि त्यापासून समोर येणारी तथ्ये आणि कागदपत्रे यांचे मूल्यांकन त्यांच्या दर्शनी मूल्य घेतल्यास तथाकथित गुन्ह्यात समाविष्ट असलेल्या सर्व घटकांचे अस्तित्व उघड होईल की नाही हे पाहण्यासाठी या पुराव्यांचे आणि कागदपत्रांचे मूल्यांकन करावे लागेल. या टप्प्यावर, न्यायालयाकडून या प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची अपेक्षा नाही आणि हा पुरावा दोषी ठरवण्याची आवश्यकता नाही. आरोपी विरुद्ध दोषसिद्ध करण्यास कारण असल्याचे प्रकरण नव्हे तर गुन्हा केला आहे हे मानण्यास कारण आहे किंवा नाही हे विचारात घेणे आवश्यक आहे. पुढे असे मानले आहे कि आरोप मुक्त करण्याच्या अर्जावर किंवा आरोप निश्चित करण्याच्या वेळी छोटी न्यायचौकशी चालवण्याला कायदा परवानगी देत नाही.

16. माझ्या मते, वरील नमूद न्यायालयीन निर्णयात लागू केलेला कायदा आणि निवेदन स्वीकृत करण्यासाठी अभिलेख व कार्यवाही (R and P ) चे अवलोकन करणे आवश्यक आहे.तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. आरोपपत्राची संपूर्ण प्रत ह्या पुनरीक्षण अर्जाच्या अभिलेखावर (on record ) ठेवलेली आहे. मृतक हिने 26.1.2016 रोजी आत्महत्या केली. संध्याकाळी 7 वाजता वडिलांना या घटनेची माहिती मिळाली. त्यांनी 27.1.2016 रोजी 19.31 वाजता तक्रार नोंदवली. लग्नापूर्वी आरोपीला हुंड्यासाठी रक्कम दिल्याचे त्यांनी त्या तक्रारी मध्ये स्पष्ट केले आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की त्यांनी विवाहानंतर घरगुती खर्चासाठी हुंडा म्हणून 40,000/- रुपयांची मागणी केली होती. मृतक हिची लेखी चिठ्ठी अभिलेखावर (on record ) ठेवण्यात आली आहे. सकृतदर्शनी या चिठ्ठी मध्ये मृतक हिला गर्भपात करण्यास भाग पाडण्यात आल्याचे उघड झाले आहे. चिठ्ठी मध्ये असे म्हटले आहे की, सासू/आरोपी क्र.2 ही गर्भपात करण्यासाठी निमत्त होती किंवा तिने तिच्यावर गर्भपात करण्यासाठी खूप दबाव टाकला होता. तिने मृतक हिला गर्भपाताच्या गोळ्यांची नावेही सुचवली. पती

आणि सासूने केलेल्या छळामुळे आणि गैरवर्तणुकीमुळे मृतक हिने लेखी चिठ्ठी मध्ये आपला राग व्यक्त केला आहे. हे खरे आहे की चिठ्ठी मध्ये हुंड्याच्या मागणीचा कोणताही विशिष्ट उल्लेख नाही.

17. मृतक हिने लेखी चिठ्ठी मध्ये म्हटले आहे की तिने तिचा मेहुणा खोब्रागडे यांच्याशी व्हॉट्सअॅप वर संभाषण केले होते . व्हॉट्सअॅपच्या संदेशांची प्रत जी अभिलेखावर (on record) नोंदवली आहे , यावरून स्पष्टपणे असे दिसून येते की, या प्रकरणी तिच्यावर करण्यात आलेल्या अत्याचाराची माहिती तिने तिचा मेहुणा खोब्रागडे याला दिली होती. व्हॉट्सअॅप संदेशांमध्ये पती आणि सासूची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे . प्रथम खबरी अहवालात वडिलांनी याबाबत काहीही सांगितले नाही, मात्र चौकशी दरम्यान जेव्हा त्यांचे निवेदन नोंदविण्यात आले तेव्हा त्यांनी देखील याबाबत तेच सांगितले आहे . घरगुती खर्चासाठी हुंडा म्हणून 40,000/- रुपये मागितल्याचा विशिष्ट आरोप प्रथम खबरी अहवालात करण्यात आला आहे. प्रथम खबरी अहवालात त्याने लग्नापूर्वी कपडे खरेदी करण्यासाठी आरोपीला रक्कम दिली होती, याची स्पष्टपणे माहिती दिली आहे. त्यांचे निवेदन 28.01.2016 रोजी नोंदविण्यात आले. हुंड्याची मागणी, गैरवर्तन आणि छळ याबाबत आपल्या मुलीने आपल्याला दूरध्वनीवर माहिती दिली होती, असे त्यांनी स्पष्ट्पणे सांगितले आहे. त्यांनी सांगितले की त्यांनी मुलीची समजूत घातली आणि तिला शांत केले. आपल्या निवेदनात त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, गर्भपात करण्यासाठी मृतक हिचा छळ करण्यात आला. आपल्या निवेदनात त्यांनी पुढे म्हटले आहे की, तिच्या पर्समध्ये एक लेखी चिठ्ठी आणि लिंग निश्चितीसाठी देय रसीद आढळली. हे लक्षात घेतले पाहिजे की उर्वरित साक्षीदारांनी आरोपी क्र.१ आणि २. यांनी दोन्ही बाबतीत सातत्याने विशिष्ट भूमिका निभावलेली आहे असे म्हण्टले आहे मयत हिच्या फोनवर संपर्कात असलेले गणेश खोब्रागडे यांनी सांगितले की आरोपींनी 40,000/- रुपयांची मागणी आणि गर्भपात करण्यासाठी मृतक हिच्यावर दबाव आणला आणि दोन्ही बाबतीत वाईट वागणूक दिली .

18. माझ्या मते, अभिलेखावरील (On Record) पुराव्याच्या आधारावर, आरोपी क्र.१ आणि २. ह्यांच्या भूमिकांमध्ये भिन्नत्व दाखवता येणे फारच कठीण आहे. त्यांच्या भूमिका सारख्याच आहेत. अभिलेखावरील (On Record) पुराव्याचा वरकरणी विचार केल्यास, ते कायद्याप्रमाणे आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे आहे. माझ्या मते, हा पुरावा विचारात घेतल्यास आणि त्याविषयीचे निष्कर्ष खरे किंवा विश्वासार्ह्य मानल्यास तो मुदतपूर्व दिलेला अभिनिर्णय ठरेल. तरुण जीत तेजपाल प्रकरणातील (वर उल्लेखित) निर्णयानुसार छोटी न्यायचौकशी घेण्याची कायद्यात तरतूद नाही. त्यामुळे, माझ्या मते, प्रथमदर्शनी, अभिलेखावरील (On Record) पुरावे, आरोपींच्या विरोधात आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे आहे. त्यामुळे अर्जदाराच्या अधिवक्त्याचे निवेदन स्वीकारता येणार नाही. त्यामुळे या टप्प्यावर, अर्जदाराच्या अधिवक्त्याने उपर्युक्त केसेस वर भर देऊन कायद्यातील तरतुदीचा जो आधार घेतलेला आहे त्याचा अर्जदाराला कोणताही फायदा होणार नाही. जर, सादर केलेल्या निवेदनांना मान्य करायचे असेल, तर, ह्या न्यायालयाला गुणवत्तेच्या आधारे पुरावयाचे फायदे आणि तोटे विचारात घ्यावे लागतील. आरोपी व्यक्तिंची भूमिका अस्पष्ट आणि सर्वसमावेशक आरोपांच्या स्वरूपात असल्याचे म्हणता येणार नाही. माझ्या मते, विद्वान न्यायाधीशांनी अर्ज (EXH.२९) फेटाळून लावणे योग्य होते. विद्वान न्यायाधीशांनी लागू कायद्याचा विचार केला आहे आणि असा निष्कर्ष काढला की संबंधित आरोपमुक्ततेसाठीचा अर्ज मंजूर करण्यायोग्य नाही. विद्वान न्यायाधीशांनी अर्ज फेटाळण्याची कारणे नमूद केली आहेत. ती कारणे कायद्यानुसार आहेत. त्यामुळे, माझ्या मते, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, चंद्रपूर, ह्यांनी योग्य कारणांसह पारित केलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याची गरज नाही. त्यामुळे पुनरिक्षण अर्ज निष्फळ ठरतो. त्यामुळे हा आदेश.

**आदेश**

हा पुनरिक्षण अर्ज फेटाळण्यात येत आहे.

**(न्यायमूर्ति जी. ए. सानप)**

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यवहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".